प्रचंड खपाचे एकमेव हीरकमहोत्सवी दैनिक

# पुढारी

कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी,
बेळगाव व पणजी येथून एकाचवेळी प्रसिद्ध

▸ वर्ष ६६ ▸ अंक ३२५ ▸ बुधवार, २४ नोव्हेंबर २००४ ▸ पाने सव्वीस ▸ किंमत २ रुपये



## डॉ. अमरसिंह निकम यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## इंदिरा गांधी सदभावना पुरस्कार प्रदान

पिंपरी (प्रतिनिधी): इंडो थायलंड फ्रेंडशिप इकॉनॉमिक कॉर्पोरेशन यांच्यावतीने दिला जाणारा 'इंटरनॅशनल गोल्ड स्टार मिलेनियम पुरस्कार' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार या वर्षी पिंपरी येथील होमीओपॅथी डॉक्टर अमरसिंह निकम यांना त्यांच्या होमीओपॅथी क्षेत्रातील वैद्यकीय कार्याबद्दल देण्यात आला आहे. तशा प्रकारचा आदेश संबंधित संस्थेकडून आजच डॉ. निकम यांना मिळाला.

बँकॉक शहरात दि. २० जानेवारी २००५ रोजी डॉ. निकम यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या अगोदर दि.१८ रोजी हैद्राबाद येथे श्रीमती इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार व सुवर्णपदक आंध्र प्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांच्याहस्ते देण्यात आले. ग्लोबल इकॉनॉमी कौन्सील च्यावतीने देण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यपाल डॉ. भीष्म नारायण सिंग होते. हा समारंभ हैद्राबाद येथील हॉटेल व्हॉईसरॉय येथे येत्या गुरुवारी पार पडला. डॉ. निकम हे होमिओपॅथी या वैद्यकीय क्षेत्रातील एक निष्णात डॉक्टर म्हणून ओळखले जातात. गेल्या २४ वर्षांपासून ते या क्षेत्रात असून आतापर्यंत हजारो रुग्णांवर त्यांनी होमिओपॅथी औषधे देऊन बरे केले आहे. असाध्य रोगांनी त्रासलेल्या अनेक रुग्णांना त्यांनी आराम मिळवून दिला आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार होमिओपॅथी वैद्यकीय क्षेत्रात शस्त्रक्रियेविना फक्त गोळ्या स्वरुपात औषधे देऊन रुग्णांना बरे केले जाते. त्यांनी उभारलेल्या होमिओपॅथी रुग्णालयात सर्व प्रकारच्या सुविधा असून रुग्णांना दाखल करून घेणारे आशिया खंडात एकमेव होमिओपॅथी रूग्णालय आहे . राज्याबाहेरअनेक रूग्ण येथे दाखल होऊन बरे होऊन गेले आहेत. होमिओपॅथी वैद्यकीय पद्धतीमध्ये रूग्णांचा विचार करून औषध देवून उपचार केलं जातात तर इतर वैद्यकिय पद्धतीत रूग्णांऐवजी रोगांचा विचार करून औषधोपचार केले जातात हा दोन्हीतील फरक आहे. असे डॉ. निकम यानी यावेळी सांगितले. इंदिरा गांधी पुरस्कार स्वीकारण्यासाठी डॉ. निकम हैद्राबादला गेले होते. तेव्हा त्यांची अनेक व्याख्याने होमिओपॅथी क्षेत्रात आयोजित केली होती. गेल्या दोन सप्ताहांत त्यांना ही विशेष पारितोषिके मिळाली आहेत. त्यामुळे सर्व थरांतून डॉ. निकम यांचे अभिनंदन होत आहे. इंटरनॅशनल गोल्डस्टार ॲवॉर्ड घेण्यासाठी डॉ. निकम बँकॉकला आपल्या पत्नीसमवेत जाणार आहेत.




आंध्रप्रदेशचे राज्यपाल श्री. सुशिलकुमार शिंदे यांच्या हस्ते पिंपरीगांव- पुणे येथील आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटलचे डॉ. अमरसिंह निकम यांना इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार दि . १८ नोव्हेंबर २००४ रोजी व्हॉईसरॉय हॉटेल हैद्राबाद येथे प्रदान करण्यात आला . यावेळी माजी राज्यपाल श्री. भिष्मसिंग व ग्लोबल